# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (Representation) क्रमांक १६६ / २०२३

वीज पुरवठा कायमस्वरूपी खंडीत केल्यानंतर सुरक्षा अनामत ठेव व्याजासह परत न मिळल्याबाबत

श्री. दशरथ दत्तू भोर ........................................................................................................ अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, नाशिक शहर विभाग २ (महावितरण)............................. प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- श्री. दशरथ दत्तू भोर

प्रतिवादीतर्फे :- श्री. नितीन पगारे, अतिरीक्त कार्यकारी अभियंता, नाशिक

कोरम :- वंन्दना कृष्णा (निवृत्त भा.प्र.से.)

ई-सुनावणी तारीख :- ११ जानेवारी २०२४

आदेश पारित दिनांक :- १८ जानेवारी २०२४

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, नाशिक परिमंडळ (मंच) यांच्या दिनांक २३ ऑगष्ट २०२३ च्या आदेशाविरूध्द उपरोक्त अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक २० नोव्हेबर २०२३ रोजी दाखल केले आहे. मंचाने अपिलार्थी यांचा अर्ज (क्रमांक ८३ / २०२२) दिनांक २३ ऑगष्ट २०२३ च्या आदेशान्वये खालीलप्रमाणे निर्देश दिले.

*"१. तक्रारदार यांची सुरक्षा ठेव व्याजासह परत मिळवी हि मागणी मंचास योग्य वाटत असून मीटर*

*काढून नेल्या पासून त्यास प्रत्यक्ष रक्कम अदा करण्याच्या दिवशी पर्यंत नियमा प्रमाणे व्याजासह परत करावी.*

*२. तक्रारदाराचे माहे जानेवारी, फेब्रुवारी व मार्च २०२१ चे देयक रद्द करण्यात येत आहे.*

*३. तक्रारदाराला सदर रक्कम परत देताना काहीही मदत लागल्यास विद्युत वितरण कंपनीने सहकार्य करावे व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करून घ्यावी तसेच Online फॉर्म भरणे असल्यास मदत करावी.*

*४. तक्रारदाराला झालेल्या विलंबापोटी व मानसिक त्रासापोटी रु.२०००/- नुकसान भरपाई देण्यात यावी. "*

२. अपिलार्थीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक ११ जानेवारी २०२४ रोजी झालेल्या सुनावणीतील प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.

- अपिलार्थी हे महावितरणचे दिनांक १८ सप्टेंबर २००० पासून सिंगल फेज घरगुती ग्राहक (क्र.०४९०८५५५३३८०) आहेत. अपिलार्थीने दिनांक १२ डिसेंबर २०२१ रोजी महावितरणकडे मागील सर्व वीज देयके व थकबाकीचा भरणा करून वीज पुरवठा कायमस्वरूपी खंडीत करण्यासाठी अर्ज केला.
- सदर अर्जानुसार दिनांक २२ डिसेंबर २०२१ रोजी भगूर महावितरण कार्यालयातील कर्मचारी येऊन मीटर काढून घेऊन गेले व वीज जोडणी कायमस्वरूपी खंडीत केली. त्यानंतर अपिलार्थीने वीज जोडणीच्या वेळी महावितरणकडे भरणा केलेली रक्कम रु १०००/- ची सुरक्षा अनामत रक्कम व्याजासह परत मिळण्यासाठी अर्ज केला. परंतू प्रतिवादी महावितरणने त्यांचे बिलिंग सायकल दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी पूर्ण होईल व नंतर आलेली थकबाकी वजा करून शिल्लक सुरक्षा ठेव रक्कम परत मिळेल, असे कळविले.
- १ एप्रिल २०२१ रोजी अपिलार्थीस जानेवारी २०२१, फेब्रुवारी २०२१ व मार्च २०२१ या कालावधीचे स्थिर आकाराचे देयक देण्यात आले. वीज पुरवठा कायम स्वरूपी बंद करून त्याच दिवशी मीटर काढून नेल्यानंतर पुढील कोणतेही देयक अपिलार्थीस मान्य नाही व कोणतीही थकबाकी रक्कम सुरक्षा ठेव रक्कमेतून वळती करू नये तसेच, सुरक्षा ठेव रक्कम व्याजासह परत करावी अशी मागणी प्रतिवादीकडे केली.
- अपिलार्थीने नमुद केले की, त्यांच्या तक्रारीची दखल घेतली नाही, म्हणून दिनांक २३ मे २०२३ रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली व मंचाने मीटर काढून नेल्या पासून त्यास प्रत्यक्ष रक्कम अदा करण्याच्या दिवशी पर्यंत सुरक्षा ठेव व्याजासह परत करावी, सदर रक्कम परत करताना अपिलार्थीस महावितरण कंपनीने सहकार्य करावे, तसेच विलंबापोटी व मानसिक त्रासापोटी

विद्युत लोकपाल मुंबई
म.वि.नि.आ.

रू.२०००/- नुकसान भरपाई देण्यात यावी. अपिलार्थींचे माहे जानेवारी, फेब्रुवारी व मार्च २०२१ चे देयक रद्द करण्याचे निर्देश दिले .

- मंचाचे आदेशाने समाधान झाले नाही, म्हणून, दिनांक दिनांक २० नोव्हेबर २०२३ रोजी विद्युत लोकपाल (मुंबई) कार्यालयात अभिवेदन दाखल केले. अपिलार्थीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम २०२१ (कृती मानके, विनियम २०२१) नुसार विलंबाबद्दल प्रति आठवडा रू.१००/- नुकसान भरपाईची तसेच मानसिक त्रासापोटी नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

३. प्रतिवादी महावितरणने दिनांक १२ डिसेंबर २०२३ च्या उत्तरातील व दिनांक ११ जानेवारी २०२४ रोजी झालेल्या ई-सुनावणीतील प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.

- अपिलार्थी हे महावितरणचे दिनांक १८ सप्टेंबर २००० पासून सिंगल फेज घरगुती ग्राहक (क्र.०४९०८५५५३३८०) आहेत. अपिलार्थीने दिनांक १२ डिसेंबर २०२१ रोजी महावितरणकडे मागील सर्व वीज देयके व थकबाकीचा भरणा करून वीज पुरवठा कायमस्वरूपी खंडीत करण्यासाठी अर्ज केला. त्यानुसार महावितरणने अपिलार्थींचा वीज पुरवठा दिनांक २२ डिसेंबर २०२१ रोजी भगूर महावितरण कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी मीटर काढला व वीज जोडणी कायमस्वरूपी खंडीत केली.
- जानेवारी, फेब्रुवारी व मार्च २०२२ ची स्थिर आकाराची वीज वापराची वीज देयके दिनांक १ एप्रिल २०२२ रोजी वीज ग्राहकास वितरीत करण्यात आली. सदर वीज देयके अपिलार्थीने अमान्य करून ती रद्द करण्यात यावी व सुरक्षा रक्कम परत करण्यात यावी अशी मागणी प्रतिवादीकडे केली.
- सदर मागण्या वेळेत पूर्ण होण्यास झालेल्या विलंबामुळे अपिलार्थीस झालेल्या मानसिक त्रासासाठी नुकसान भरपाईची मागणी केली. सदर नुकसान भरपाई मिळाली नाही म्हणून अपिलार्थीने दिनांक २३ मे २०२३ रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली.
- मंचाच्या आदेशान्वये अपिलार्थीची अपिलार्थीचे माहे जानेवारी, फेब्रुवारी व मार्च २०२१ चे देयक रद्द करण्यात आली व नुकसान भरपाई म्हणून रक्कम रू.२०००/-, धनादेश क्रं. ६६६७०५, दिनांक ११ डिसेंबर २०२३ नुसार देण्यात आली. तसेच, मीटर काढल्यापासून सुरक्षा ठेव अनामत रक्कम परत करण्याच्या तारखेपर्यंत व्याज देण्याची प्रक्रीया सुरू आहे. मंचाच्या आदेशाचे पालन

विद्युत लोकपाल मुंबई म.वि.नि.आ.

केले असून अपिलार्थीचे सदर अभिवेदन निकाली काढण्यात यावे अशी विनंती प्रतिवादीनी केली आहे.

**विश्लेषण व निर्णय**

४. अपिलार्थी हे महावितरणचे सिंगल फेज घरगुती ग्राहक (क्र.०४९०८५५५३३८०) आहेत. अपिलार्थीने विनंती करूनही महावितरणकडे भरणा केलेली सुरक्षा ठेव या रक्कमेचा परतावा सुरक्षा ठेव परत करावयाच्या तारखेपर्यंत व्याज दिले नाही या कारणास्तव सदरचे अभिवेदन दिनांक २० नोव्हेंबर २०२३ रोजी दाखल केले.

५. मंचाने दिलेले आदेश व त्यावर महावितरणने केलेली कार्यवाही, तसेच सुनावणी दरम्यान दोन्ही पक्षकारांमध्ये झालेली चर्चा, स्पष्ट झालेल्या बाबी व उपलब्ध कागदपत्रांचे व प्राप्त ई-मेल इ. चे अवलोकन करून सदर अभिवेदनाबाबत असे निदर्शनास येते की, अपिलार्थींना देय असलेली सुरक्षा ठेव रक्कम रू.६४०/- दिनांक ४ डिसेंबर २०२३ रोजी देण्यात आली. दिनांक १२ जानेवारी २०२४ रोजी उर्वरीत रक्कम रू.३६०/- व त्यावरील व्याज असे मिळून रक्कम रू.४४३/- (धनादेश क्रमांक ६६६७४१ दिनांक १२ जानेवारी २०२४) व्याजासह महावितरणकडून दिनांक १२ जानेवारी २०२४ रोजी देण्यात आली. अपिलार्थीने सदर रक्कम मिळाल्याची पोच देखील दिलेली आहे. सबब, अपिलार्थींच्या तक्रारीचे निराकरण झालेले आहे. मानसिक त्रासापोटी मंचाने पारीत केलेल्या आदेशान्वये रक्कम रू.२०००/- नुकसान भरपाई धनादेश क्रं. ६६६७०५, दिनांक १२ डिसेंबर २०२३ ने देण्यात आली आहे.

६. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वालिटी) विनियम २०२१ मधील जोडपत्र २ : कृतीच्या मानकांची पूर्तता न केल्यामुळे द्यावयाची भरपाई या बाबत अनुक्रमांक ७ 'अन्यसेवा' मधील क्रमांक (दोन) मध्ये देय भरपाईबाबत तत्क्याच्या रकाना क्र.४ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

"रू.१००/- विलंबाच्या प्रत्येक आठवड्यास किंवा त्याच्या भागास जास्तीत जास्त रू.५००/- च्या अधीन राहून"

म.वि.नि.आ.

६.  मंचाने अपिलार्थीस रू.२०००/- नुकसान भरपाई दिली आहे. दोन्ही पक्षकारांनी उर्वरीत गाऱ्हाणे समोपचाराने सोडवणे गरजेचे होते. या सर्व बाबींचा विचार करता हे न्यायालय या बाबत खेद व्यक्त करत आहे.

७.  अपिलार्थींच्या सर्व तक्रारीचे निराकरण झाले असल्याने सदरचे अभिवेदन निकाली काढण्यात येत आहे.

सही/-
(वन्दना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)